GRT

Golden Research Thoughts

ISSN: 2231-5063 Impact Factor : 4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 6 | December - 2016

कन्नड येथील महानुभाव मंदिर

प्रा.डॉ.भानुसे कारभारी लक्ष्मण
इतिहास विभाग , शिवाजी महाविद्यालय कन्नड.

प्रस्तावना

महानुभाव पंथाविषयी संशोधन करतांना अभ्यासकांना असे लक्षात येते की, या पंथाने आणि चक्रधराने मराठी भाषेत फार मोठे कार्य केलेले आहे. या पंथाचा संस्थापक हा चक्रधर स्वामी मुळचा गुजरात प्रातांचा म्हणजे या प्रातांचा सुमारे ७५० वर्षापुर्वी त्रिमलदेव नावाचाराजा त्याचा प्रधान विशालदेव विशालदेवाचा पुत्र हरपाळ आणि पुढे हरपाळ हाच चक्रधर या नावाने प्रसिध्दीस येऊन महानुभाव पंथाचा संस्थापक झाला.[१] पुढे हरपाळ हा ऋध्दिपुराकडे गेला आणि गोविंदप्रभुंना भेटला आणि त्यांनी त्यांचे नावचक्रधर असेठेवले. शके ११३२ चा असावा असे डॉ.कोलते मानतात.[२] एके दिवशी पोहण्यास गेला असतांना तो बुडाल्याची वार्ता पत्नीस कळाली व ती मरण पावली यातच तोविरक्त मनस्थितीत गावसोडून जंगलात फीरु लागला आणि भोवतीच्या तीरावरश्री.दत्तात्रयाचे दर्शनघडले. यापुढे चक्रधरांनी शिष्यसंप्रदाय वाढवून उपदेश करायला सुरुवात केली.चक्रधरांचा पहिला शिष्य नागदेवाचार्य या शिष्याला केलेला उपदेश मुर्तिप्रकाश ग्रंथात सापडडतो पुढे चक्रधर हिमालय पर्वतावर जाऊन नाहीसेहोतात. शके११९६ त्यांचे वय मृत्युसमयी ८०वर्षे असावे आणि त्यांचावध हेमाद्रीने केला असावा परंतु याला निःसंदीग्ध असा आधार मीळत नाही.

पंथाच्या नावाविषयी मंतांतरे :-

महानुभव पंथाच्या संदर्भाने जी जी साहित्य आणिग्रंथ आहेत त्याच्या आधारे जी माहिती मीळते त्या अनुरोधानेकिंवा त्याचा आधारघेउन हा पंथ आजवर महानुभाव पंथ, महात्मा पंथ, अच्युत पंथ, जयकृष्णी पंथ, भटमार्ग आणि परमार्ग या नावानी परीचीत आहे. महानुभावाचा अर्थमहान अनुभवी असाघेतला जातो.देशात या पंथाला ढोंगीव आचारविचारांचीनिंदा करणारा पंथ म्हणुन परीचीत झाला परंतु महाराष्ट्रात महानुभाव या नावानेच प्रसिध्द झाला.

खरं तरचक्रधरांचे शिष्य, अनुयायी एकमेकांना महात्मा म्हणुन संबोधतात यावरुन हे नाव आले असावे.जयकृष्णी हा पंथ पंजाबात मोठा झाला आणि भटोबास यांचे महानुभाव पंथात जास्तीचे महत्व वाढले तेव्हा भटमार्ग हे नाव प्रसिध्द झाले.

महानुभवांचे तत्वज्ञानव आचारधर्म :-

महानुभाव हे द्वैती आहेत. त्यांच्या मते जीव, देवता, प्रपंच व परमेश्वर या चारवस्तुस्वतंत्रव नित्य आहेत. मोक्षप्राप्तीसाठी ज्ञानमार्ग व भक्तीमार्ग सांगितले आहेत. भक्त जसाईश्वरात रममान होतो, तसाईश्वर भक्तात रममान होत नसुन तो स्वस्वरुपी रमतो. तसेच श्रीकृष्ण, श्री दत्तात्रेय, द्वारावतीचेचांगदेवराऊळ, ऋध्दीपुरचे गुंडम राऊळ, वश्रीचक्रधरहे महानुभवांचे पंचकृष्ण आहेत. हिंसेचा भाग या पंथीयांना मान्य नाहीत.[३] चक्रधरांचा स्पर्श झालेलीवस्तु पुस्तके पाषान ते पुज्य मानतात.यापंथात स्त्रीया संन्यास घेऊ शकतात. म्हाइंभट, लीळाचरित्र, गोविंदप्रभु चरित्र, ऋध्दीपुरचरित्र, केशवराजसुरी, शिदांत सुत्रपाठ, दृष्टांतपाठ, मुर्तीप्रकाश, भावे देवव्यास, परशराम, लक्ष्मींद्रभट, गोपाळ पंडीत, महदंबा, धवळे, गर्भकांडे ओव्या इत्यादी ग्रंथ आणि ग्रंथकारांच्या माध्यमातुन महानुभाव पंथांच्या तत्वज्ञानावर प्रकाश टाकता येतो आणि सांप्रदाय महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात विखुरलेलाहोता तसेच मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात मंदिरे वसाधक आहेत पैकी कन्नड येथे सुध्दा महानुभावांचे मंदिर आहे.

कन्नड येथल महानुभाव मंदिर :-

कन्नड तालुकाहा ऐतीहासीक भौगोलीक, बहुभाषीक, सांस्कृतीक अशा अनेकघटकांनी नटलेला आहे. प्रामुख्याने येथे सातमाळा डोंगर, अजिंठा डोंगर, काळदरी, भिलदरी, किल्ले, पितळखोरा लेणी, पाटणा विशेषतः जुन्या ऋषीमुनी, संत महंत यांच्या समाध्या व पाउलखुणा असलेली मंदिरे व स्थापत्य या परिसरात आहे. याच कन्नड शहरातशितला माता मंदिराच्या बाजुला महानुभावाचे शिध्द स्थान म्हणुन शहराच्या मध्यभागी माळीवाडा, पवारगल्ली येथे महानुभावांचे मंदिर आहे. कन्नड गांव तसे ऐतिहासीक पटलावर राहिलेले आहे.कारण प्राचीन काळात पाटणा आणि भोकरदन हे व्यापारी केंद्र असल्यामुळे येथे काही ऐतिहासीकखुणा आहेत.

कन्नड येथील मंदिर हे२०० वर्षे जुने असावे असे सांगतात.मंदिराच्या कळसाचे काम नवीन झालेले आहे. कन्नड परिसरात महानुभावांची अनेक मंदिरे आहेत. हतनुर, माटेगांव, विटखेडा, करंजखेडा, सायगव्हाण, वाघळी इत्यादी ठिकाणी महानुभावांचे भक्तगण

मोठ्या प्रमाणात आहेत. हे मंदिर उत्तराभिमुख असुन या मंदिराचा मुख्य गाभारा पश्चिमेस असुन पुर्वाभिमुख आहे. मंदिर हे१५X १५ फुट असुन मंदिरावर ३० फुट उंचीचा कळस आहे.मंदिराच्या पश्चिम भागातील भिंतीला टेकूनचक्रधरांचेस्थान ओटा, चौथरा आहे.तो४X२.५ असुन त्यावर मखमली, पिवळा कलर असलेला कपडा आहे.त्यावर दोनफुट उंचीची मुर्ती आहे.त्याच चौथऱ्यावर एक पाषानी दगड ठेवला आहे.त्याला महानुभाव पंथात विशेष असे म्हणतात. मंदिराच्या दक्षिणे कडील भिंतीला लागुन द्राक्षघड स्पर्शने स्थान आहे.द्राक्षघड स्पर्शने स्थान म्हणजेलीळाचरित्रात त्याचा उल्लेख आहे की, सर्वज्ञ श्रीचक्रधरप्रभु रात्री आरोगणा झाल्यावर अंगणामध्ये शत पावली करीतहोते. अंगणात द्राक्षांचा मांडव होता.द्राक्षाचे घड लोंबतहोते.शतपावली करतांना त्यांनी त्याला स्पर्श केला.[४] उत्तरेकडील बाजुसवस्तीस्थान दर्शविण्यात आलेले आहे.स्थान म्हणजे प्रभु जेथे जातात ती जागा. प्रभु येथे जेव्हा आले तेव्हा तेथे ब्राम्हणांचे घरहोते. सर्वज्ञ श्रीचक्रधरप्रभु परिभ्रमणाच्या पुर्वार्ध काळातहतनुरवरुन कन्नडला आलेहोते. त्यांचे या ठिकाणी एकरात्र वास्तव्य होते.[५] येथुनच ते पुढे सायगव्हाण येथे गेले.

'' कनरडे मग येउनी श्रीहरी । द्विज गृहीवसती बरवीकरी ।
परम सायगव्हाण हिवाघळी । विचारतावसुधा सुखमंडळी ।।

या लीळेवरुन प्रभु हतनुरवरुन कन्नड, कन्नडवरुन सायगव्हाण व नंतरवाघळी येथे गेल्याचे आपणास ज्ञातहोते.

- ★ मंदिरामध्ये वस्तीस्थान आहे. प्रभु जेथे थांबले ती जागा - मंदिरात दक्षिणाभिमुख आहे. एकरात्र वास्तव्य होते.
- ★ अरोगणास्थान - हेस्थानवस्ती स्थानापासुन पुर्वेस ८ फुट ७ इंच अंतरावर आहे. सर्वज्ञांनी येथे ब्राम्हणाच्या पुजा अरोगणाचास्वीकार केला कारणहेघर ब्राम्हणाचे होते.
- ★ द्राक्षघड स्पर्श स्थान - हेस्थान वस्तीस्थानापासुन पुर्वेस २४ फुट अंतरावर पुढील सभा मंडपात पुर्व भितींच्या दुभाणीत आहे.
- ★ गावाच्या दक्षिणेच्या मळ्यातील वस्तीस्थान - अशी कन्नडला प्रभुंची चारस्थानेहोती. या वेळी कन्नडचा उल्लेखलीळाचरीत्रातवस्थानपोथीत कनरडे असा आहे.[६]

समारोप :-

कन्नड येथील महानुभाव मंदिरात नियमीतपणे साधक येउन पुजाविधी चालतात. मंदिराच्या परिसरात भक्ताच्या निवासाची सोय करण्यात आली आहे. चैत्र पोर्णिमा वगोकुळ अष्टमीला येथे उत्सव असतो. स्वामीजी प्रसन्न होतात या भावनेतुन येथे नवससुध्दा बोलले जातात. या वस्तीस्थानाच्या ठिकाणी प्रसाद म्हणुन नारळ, फुटाणे, लाह्या, दहीभात चालतो. नामस्मरणासाठी पाच गाठी वापरल्या जातात. गाठी म्हणजे मण्यांची माळ, प्रभु जेथे जेथेवस्तीसहोते. तेथुन पाषानाचा दगड आणला जातो. त्याला विषेश म्हणतात असेविशेष येथे आहेत. प्रसाद म्हणजे प्रभुंच्या समंधातील कपडे, वस्तु भांडी, खाट, दगडांची अवशेषदिली जातात. 'संसारातराहुन जे प्रपंच करतात त्यांना वासनिक असे म्हणतात.''[१०] संन्यासी शिष्टमंडळाला भिकसुक म्हणतात. प्रभुंचे सर्व भक्त काळे कपडे वापरतात त्याची आख्यायिका सांगितली जाते त्याला आधारनाही. मंदिरात पुजा ही तीनवेळेस केली जाते.विधीहा दही, तुप, साखर, मध व दुध अशा पंचामृताने होतो.माध्यान्हकाळचे स्तवन, श्रीदत्त स्तवन केले जाते.श्रीकृष्णाचीलीळावर्णन करणारीगाणीगाईली जातात. आणि कन्नड परिसरात मोठ्या प्रमाणात महानुभवांचे साधक आहेत. कारण कन्नड वरुन जवळच जाळीचा देवहे प्रभुंचे निवासाचेठिकाण आहेववाघळीहे एक प्रसिध्द स्थान आहे कारणवाघळी मंदिरात ३X५ आकाराचाशिलालेख आहेवहे मंदिर हेमाडपंथी आहे.

निष्कर्ष :-

१. लाडांच्या मनात या पंथाविषयी जो अनादर निर्माण झाला त्याविषयी एकनाथ महाराज, तुकारामांनी तीव्र उदगार काढले त्याची मीमांसा महाराष्ट्र सारस्वतात डॉ.भावे यांनी केल्याचे आढळते.
२. हा पंथ स्त्री पुरुष समानता माननारा जगातील पहिला क्रांतीकारी पंथ आहे.
३. या पंथानी चातुवर्ण, राहणीमान, पोशाख, अस्पृश्यता, चालीरीतीवसांस्कृतिक पंरपरा टाळणाराहोताअसे कै.भावे म्हणतात परंतु त्याचा लीळाकिंवा पोथी यांच्यात कुठेही उल्लेख सापडत नाही.
४. महानुभाव हे मुर्तीपुजक नव्हते आणि औरंगजेबापासून त्यांना जिजीया करातसवलतहोतीहे जरासंदीग्ध आहे.
५. महानुभाव साहित्य संशोधनात अडचणी आहेत कारण पोथ्याची दुर्बलताव अनुपलब्धी.पोथ्या अजुनहीवस्त्रेवेष्ठीत आहेत.
६. महानुभाव पंथात आख्यायिकेला जास्त महत्व दिले जाते.मात्र अंधश्रध्दा मानता येणार नाही.

संदर्भ :-

१. डॉ.श्री.म.पिंगे, प्राचीन मराठी वाङःमयाचा परमार्थ, अजय प्रकाशन औरंगाबाद, पृ.१८
२. डॉ.श्री.म.पिंगे, महानुभाव पंथ व त्यांचे ग्रंथ, पृ.१९
३. रमेश वामण आवलगावकर, महानुभावांची अन्वयस्थळे, चंद्रकला प्रकाशन पुणे, १९९६.
४. स्थानपोथी, पू.कृ.ली. ३७८. लीळाचरीत्र, प्रा.पुरषोत्तम दादा नागपुरे, ओंकार प्रकाशन २०१४.
५. स्थान पोथी पू.ली.क्र. ३७८,२४२,२४५,
६. लीळाचरित्र पू.ली.क्र.३४४,पु.११६
७. महानुभाव साहित्य संशोधन, खंड १, डॉ.यु.म.पठाण, मराठवाडा विद्यापीठ प्रकाशन.१९७३